आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

२५ एप्रिल २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- दुसऱ्या टप्प्यातल्या ८८ लोकसभा मतदारसंघांत उद्या मतदान, राज्यातल्या ८ मतदारसंघांचा समावेश

- चौथ्या टप्प्यातल्या मतदारसंघात अर्ज भरण्याची मुदत संपली, पाचव्या टप्प्यासाठी उद्यापासून अर्ज भरण्याची मुभा

- उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या पक्षाचे जाहीरनामे प्रसिद्ध

- नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी यांनी प्रचारसभेत आचारसंहितेचं उल्लंघन केल्याच्या तक्रारींप्रकरणी केंद्रीय निवडणूक आयोगाची भाजपा आणि काँग्रेसला नोटीस

**आणि**

- बिहारमध्ये पाटण्यात हॉटेलला लागलेल्या आगीत ६ जणांचा मृत्यू, १५ जण जखमी

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या मतदानासाठी यंत्रणा सज्ज झाली आहे. १२ राज्यं आणि जम्मू कश्मीरसह, एकूण ८८ मतदारसंघामधे या टप्प्यात उद्या मतदान होणार आहे. केरळमधल्या २०, कर्नाटक-१४, राजस्थान-१३, उत्तरप्रदेश-८, मध्यप्रदेश-६, आसाम आणि बिहार प्रत्येकी ५, पश्चिम बंगाल

आणि छत्तीसगड प्रत्येकी ३, तर मणीपूर त्रिपूरा आणि जम्मू कश्मीरमधल्या प्रत्येकी एका जागेचा यात समावेश आहे.

मध्यप्रदेशातल्या बेतुल मतदारसंघातही या टप्प्यात मतदान होणार होतं, मात्र तिथल्या बसपा उमेदवाराचं निधन झाल्यामुळे तिथं तिसऱ्या टप्प्यात मतदान होईल. वायनाडमधून काँग्रेस नेते राहुल गांधी, तिरुअनंतपुरममधून केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर आणि काँग्रेस नेते शशी थरुर, दक्षिण बेंगळुरुमधून तेजस्वी सूर्या, मथुरेत हेमामालिनी, मेरठमधून अरुण गोविल हे भाजपा नेते, मंड्या मतदारसंघातून कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एच डी कुमारस्वामी, इत्यादी महत्त्वाचे नेते या टप्प्यात निवडणूक लढवत आहे. एकूण १ हजार २०२ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघात उद्या दुसऱ्या टप्प्याचं मतदान होणार असून मतदानाच्या दृष्टीनं संबंधित मतदारसंघात प्रशासनानं जय्यत तयारी केली आहे. अकोला, हिंगोली, परभणी, नांदेड, यवतमाळ-वाशिम, अमरावती, वर्धा आणि बुलडाणा या मतदारसंघामधे मिळून २०४ उमेदवार या टप्प्यात नशीब आजमावत आहेत.

विद्यमान खासदार प्रतापराव जाधव, नवनीत राणा, रामदास तडस, प्रतापराव पाटील-चिखलीकर, संजय जाधव यांच्यासह प्रकाश आंबेडकर, महादेव जानकर असे अनेक महत्त्वाचे उमेदवार या मतदारसंघातून निवडणूक रिंगणात आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपली. यात **नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना,**

**औरंगाबाद, पुणे, मावळ, शिरुर, अहमदनगर, शिर्डी** आणि बीड या मतदारसंघांचा समावेश आहे.

या टप्प्यात हीना गावित, स्मिता वाघ, रक्षा खडसे, रावसाहेब दानवे, संदीपान भुमरे, चंद्रकांत खैरे, इम्तियाज जलील, मुरलीधर मोहोळ, रविंद्र धंगेकर, श्रीरंग बारणे, अमोल कोल्हे, शिवाजीराव आढळराव पाटील, सुजय विखे-पाटील, निलेश लंके, सदाशिव लोखंडे, भाऊसाहेब वाकचौरे, पंकजा मुंडे यांच्यासह अनेक उमेदवारांनी या मतदारसंघातून अर्ज भरले.

या उमेदवारी अर्जांची उद्या छाननी होणार असून सोमवारपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. या टप्प्यात ९ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ९६ लोकसभा मतदारसंघांमध्ये १३ मे रोजी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी अर्ज भरायची मुदत उद्यापासून सुरू होणार आहे. या मतदारसंघात इच्छुकांना ३ मे पर्यंत अर्ज भरता येतील. यात राज्यातल्या १३ मतदारसंघांसह देशातल्या एकूण ४९ मतदारसंघांचा समावेश आहे. त्यात मुंबईतले सर्व ६ मतदारसंघ, ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. काँग्रेसनं आज उत्तर मध्य मुंबईतून वर्षा गायकवाड यांची उमेदवारी जाहीर केली. गेल्यावेळी प्रिया दत्त यांनी या मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. उत्तर मुंबईतून काँग्रेसचा उमेदवार अजून जाहीर व्हायचा आहे.

महायुतीनं नाशिक, ठाणे, पालघर, दक्षिण मुंबई, उत्तर मध्य मुंबई आणि वायव्य मुंबईतले उमेदवार अजून जाहीर केलेले नाहीत.

<><><><><>

धर्माच्या आधारावर, आरक्षण देण्याची भूमिका घेऊन काँग्रेस डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा आणि त्यांच्या सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा अपमान करत आहे, अशी टीका भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे. ते आज उत्तरप्रदेशात आग्रा जिल्ह्यात आयोजित प्रचार सभेत बोलत होते. समाजवादी पार्टी आणि काँग्रेस हे दोन्ही पक्ष ओबीसींच्या बाबतीत तोंडदेखलेपणा करत असून, केवळ अनुनय हाच त्यांच्या आघाडीचा आधार आहे, असं ते म्हणाले. बरेलीमधेही त्यांनी काँग्रेस आणि समाजवादी पार्टीतल्या आघाडीवर टीका केली.

समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी आज कनोज लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. बहुजन समाज पार्टीचे समन्वयक आकाश आनंद यांनी आज आझमगड आणि वाराणसी इथं सभा घेतल्या. तर काँग्रेसचे उत्तर प्रदेशातले निवडणूक प्रभारी अविनाश पांडे यांनी आज लखनौमधे पक्ष कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा जाहीरनामा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज मुंबईत जाहीर केला. किमान ५ जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवू, शेतकऱ्यांना कर्जमुक्त करु, पीकविम्याचे निकष बदलू, ‘विकेल ते पिकेल’ या योजनेचं पुनरुज्जीवन करु, जिल्हा रुग्णालयं अद्ययावत करु, रोजगाराच्या संधी वाढवणे इत्यादी घोषणा या वचननाम्यात केल्या आहेत. देशाची आर्थिक राजधानी म्हणून मुंबईचं स्थान पुन्हा मिळवून देऊ, असंही ते म्हणाले. पर्यावरणाला घातक प्रकल्पांना आपला विरोध कायम राहील, असं

त्यांनी सांगितलं. शेतीसाठीच्या वस्तूंवर जीएसटी हटवणं, आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्याच्या पुढे नेण्यालाही उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा दिला आहे.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा आज पुण्यात प्रसिद्ध झाला. शपथनामा नावाने प्रसिद्ध झालेल्या या जाहीरनाम्यात स्वयंपाकाचा गॅस दर पाचशे रुपयांपर्यंत करणे, नोकऱ्यांमधील वीस लाख सरकारी रिक्त जागा भरण्यावर भर दिला आहे. जातनिहाय जनगणना, कृषी कल्याण आयोगाची स्थापना, महिलांना नोकऱ्यांमधे ५० टक्के आरक्षण, शिकाऊ उमेदवार म्हणून नोकरीचा अधिकार, याबरोबरच जम्मू काश्मीरला राज्याचा दर्जा देण्याला पूर्ण पाठिंबा या मुद्द्यांचा यात समावेश आहे. एक देश एक निवडणूक या संकल्पनेला पक्षाचा विरोध असल्याचंही या जाहीरनाम्यात स्पष्ट केलं आहे. नागरिकत्व कायदा, राष्ट्रीय नागरिक नोंदणी, दहशतवादाविरोधातला युएपीए कायदा इत्यादी कायद्यांचा फेर आढावा घेऊन त्यात बदल करण्याचं आश्वासन शरद पवार यांच्या पक्षानं दिलं आहे.

**<><><><><>**

कोणतेही आरोप करण्यापूर्वी भाजपानं काँग्रेसचा जाहिरनामा वाचावा असं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. लोकसभा निवडणूकीच्या पहिल्या टप्प्यात चांगली कामगिरी न झाल्यामुळे भाजपा खोटे आरोप करत असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. काँग्रेसचा जाहीरनामा हा गरीबांसाठी असून तो सर्व जातीधर्माच्या युवक, महिला, कामगार आणि शेतकऱ्यांना न्याय देणार असल्याच त्यांनी समाजमाध्यमावर दिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमाच्या उद्याच्या भागात आपण कोल्हापूर आणि हातकंणगले लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निवडणूक प्रचारसभेत आचारसंहितेचं उल्लंघन केल्याच्या तक्रारीची दखल केंद्रीय निवडणूक आयोगानं घेतली असून भाजपा आणि काँग्रेस पक्षाध्यक्षांना नोटीसा जारी केल्या आहेत. येत्या सोमवारी, सकाळी ११ वाजेपर्यंत आपापले जबाब दाखल करायला आयोगाने सांगितलं आहे.

**<><><><><>**

निवडणूक रोखे प्रकरण हा मोठा घोटाळा असून त्याची विशेष तपासपथक एसआयटीमार्फत चौकशी केली जावी, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. कॉमन कॉज आणि सेंटर फॉर पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशन या संस्थांनी ही याचिका दाखल केली आहे.

**<><><><><>**

एशिया व्हिडिओ इंडस्ट्री असोसिएशननं मुंबईत आयोजित केलेल्या फ्युचर ऑफ व्हिडीओ इंडिया या परिषदेचं उद्घाटन, माहिती आणि प्रसारण विभागाचे सचिव संजय जाजू आणि भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकारणाचे अध्यक्ष अनिल कुमार लाहोटी यांनी आज केलं.

भारतीय माध्यम आणि मनोरंजन उद्योगाला शंभर अब्ज अमेरिकी डॉलर्सची बाजारपेठ मिळवण्यासाठी चालना देण्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचं उद्दिष्ट असल्याचं संजय जाजू यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

बिहारमध्ये पटना जंक्शन जवळ आज दुपारी एका हॉटेल मध्ये लागलेल्या आगीत ६ जण मृत्युमुखी पडले आणि १५ जण जखमी झाले. जखमींवर पटना वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. अपघात स्थळावरून ४५ जणांची सुटका केल्याचं अग्निशमन दलाच्या सूत्रांनी सांगितलं. हॉटेल मधल्या एलपीजी सिलेंडरचा स्फोट झाल्यानं ही आग लागली.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैद्राबाद इथं सनरायझर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सामना सुरु आहे. बंगळुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला असून शे◌ेवटची बातमी हाती आली तेव्हा त्यांच्या ९ षटकात २ बाद ८४ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**